**न्यायालयीन प्रकरण/तात्काळ**

क्र. पोमसं/१४/६६/वि.स.-मुल्ला व इतर,रायगड/१७२/२०१७ मुंबई, दि. ०७/०४/२०१७

**संदर्भ** :- या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/१४/६६/फौसंप्र-१९७/२००२, दि. १५/०५/२००२.

**विषय** :- शासनास प्रस्ताव / पत्रव्यवहार करतांना योग्य कार्यपध्दत अवंलबिण्याबाबत.

**************

**परिपत्रक**

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन शासनाने एका प्रकरणात विधि सहाय्य देण्याबाबतचे प्रस्ताव तसेच इतरही प्रस्ताव परस्पर शासनास न पाठवता या कार्यालयाच्या मार्फतीने पाठविण्याबाबत सर्व क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्याबाबत सूचित केले आहे. या कार्यालयाच्या वारंवार असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच प्रकरणात पोलीस घटक प्रमुखांकडून शासनास प्रस्ताव/ अहवाल/अभिप्राय योग्य मार्फतीने सादर केले जात नाहीत. अश्या प्रकरणात शासन परस्पर निर्णय न घेता, ते या कार्यालयाच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात येतात. परस्पर शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत हे कार्यालय अनभिज्ञ असल्याने त्यावर अभिप्राय देणे शक्य होत नाही. परिणामी प्रकरण निकाली काढण्यास अनावश्यक विलंब होतो. कार्यालयीन कार्यपध्दतीनुसार शासनास किंवा वरिष्ठ कार्यालयास पत्रव्यवहार करतांना घटकांनी त्यांच्या नियंत्रक अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास सादर करणे क्रमप्राप्त / बंधनकारक आहे.

तसेच विधि सहाय्य देण्याच्या प्रस्तावात संबंधित पोलीस अधिकारी / कर्मचारी यांनी केलेली कृती ही कर्तव्यावर असतांना सद्भावनेने केली असल्याचे प्रामाणित करणे क्रमप्राप्त आहे.

खालील नमूद सर्व पोलीस घटक प्रमुखांना याद्वारे सूचित करण्यात येते की, शासनास किंवा वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव /अहवाल / अभिप्राय सादर करताना तो परिपूर्ण/ स्वयंस्पष्ट असल्याची खात्री करुन आवश्यक त्या प्रमाणपत्रासह योग्य मार्फतीने त्यांचे अभिप्रायासह सादर करण्याबाबत संबंधितांना योग्य ती सूचना दयावी, जेणेकरुन प्रकरणाचा निपटारा करण्याच्या प्रक्रियेत अनावश्यक विलंब टाळता येईल.

५/४

**(प्रभात कुमार)**
विशेष पोलीस महानिरीक्षक(का. व सु.)
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त.
सर्व अपर पोलीस महासंचालक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
सर्व पोलीस अधीक्षक.
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.

**प्रत :-**

पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहाय्यक (गुन्हे), म.रा., मुंबई.
कार्यासन अधिकारी, का. क्र. ३६ व ए.पी.ए.शाखा.

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता :-**

पोलीस उप अधीक्षक, संगणक विभाग, म.रा.,मुंबई.

२/- यांना विनंती आहे की, वरील परिपत्रक कृपया महाराष्ट्र पोलीस विभागातील संकेत स्थळावर फलॅश करण्यात यावे.

Sub :- Regarding procedure to be followed while sending proposals or communicating with the Govt. (15 days.)